ISSN 2321-9572

# सामाजिक अनुसंधान

त्रैमासिक- वर्ष १ले • अंक ४था • जून - सप्टेंबर -२०१४ • मूल्य १००रु.

*International Level Refered*



• संपादक •

कैलास गणपतराव कानिंदे

Scanned by CamScanner

MAHMAR 42198/2013
*International Registered & Recognized* ISSN 2321-9572
*Research Journal Related to Higher Education for all subjects*

# सामाजिक अनुसंधान

त्रैमासिक • वर्ष 1 ले • अंक 4 था • जून -सप्टेंबर-2014

• संपादक : प्रा. कैलास कानिंदे •

• कार्यकारी संपादक •
डॉ.सिध्दार्थ जाधव (बीड)
मनोज गिमेकर (भोकर)

• सहसंपादक •

डॉ.सुभाष पवार (अमरावती)
प्रा.भारत कल्याणकर (अमरावती)
प्रा.संदिप गोरे (वसमत)
प्रा.व्यंकट कोरेबोईनवाड (जालना)
प्रा. राहुल पंडित (जुन्नर)
प्रा.लक्ष्मण डोंगरे (हिमायतनगर)
प्रा.साईनाथ बनसोडे (औरंगाबाद)
प्रा. सुभाष रगडे (नांदेड)

सामाजिक अनुसंधान त्रैमासिक अंकातील लेखकांची/संशोधकाची मते ही त्यांची वैयक्तिक असून त्याबद्दल मुद्रक, मालक, प्रकाशक, संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

टिप - कॉपीराईट विषयी आलेल्या तक्रारी बाबत संबंधित लेखांचे संशोधक, लेखक जबाबदार असतील. मुद्रक,मालक, प्रकाशक, संपादक मंडळ जबाबदार राहणार नाहीत.

"सामाजिक अनुसंधान" हे त्रैमासिक मुद्रक मनोहर दिगांबर जोंधळे यांनी मालक, प्रकाशक, संपादक कैलास गणपतराव कानिंदे यांच्याकरीता रोहिणी प्रिंटींग प्रेस, वैशालीनगर, प्लॉट नं.19, तरोडा (बु.) नांदेड 431605 येथे छापून कार्यालय "मुक्ताई निवास", वनक्षेत्र कार्यालयाजवळ, समतानगर,भोकर ता.भोकर जि. नांदेड - 431801. येथे प्रकाशित केले.

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शोध निबंधाचे शीर्षक | संशोधकाचे नाव | पृ.क्रं. |
|---|---|---|---|
| १ | स्वतंत्र मजूर पक्षाची ऐतिहासिक पार्श्वभूमी. | प्रा. राहुल पंडित | १ |
| २ | शिवधर्म एक सामाजिक चळवळ | प्रा.तातेराव पवळे | ५ |
| ३ | भारताच्या अंतर्गत सुरक्षेसमोरील आव्हान : नक्षलवाद | डॉ. सुभाष के. पवार | १३ |
| ४ | सार्कचे शैक्षणिक कार्य | प्रा. भरत राठोड | १६ |
| ५ | शिक्षण प्रणालीतून मूल्यांचे संवर्धन व संक्रमण. | चित्ररेखा गोणारकर | २१ |
| ६ | १६ वी लोकसभा निवडणूक निकाल एक दृष्टिक्षेप | प्रा. नामदेव बाबुराव डोंगरे | २४ |
| ७ | शिवकालीन अर्थव्यवस्था : एक दृष्टिक्षेप | श्री. एस.एन. कसबे | २७ |
| ८ | स्त्रियांविरुध्दचे कुटुंबातर्गत हिंसाचार- एक अभ्यास | योगेश अंबुलगेकर ,<br>डॉ. डब्ल्यु.आर.मुज्जावर | ३१ |
| ९ | शेतकरी आत्महत्या : कारणे व उपाय | प्रा.फिसफिसे टी.आर. | ३४ |
| १० | मानवी हक्क आणि महिला विषयक दृष्टिकोन | कानिंदे के.जी. , प्रा. पंडीत आर. बी. | ४० |
| ११ | ग्रामीण समुदायाचे नागरी समुदायाकडे होणारे स्थलांतर- एक अभ्यास | योगेश अंबुलगेकर | ४३ |
| १२ | आदिवासींचा धर्म आणि धार्मिक पध्दतीचा अभ्यास | प्रा.कानिंदे के.जी. | ४७ |
| १३ | मराठी दलित साहित्य: एक अभ्यास | प्रा. व्यंकट दिगंबरराव कोरेबोईनवाड | ५० |


Scanned by CamScanner

# शिवकालीन अर्थव्यवस्था : एक दृष्टिक्षेप

श्री. एस.एन. करवे
अर्थशास्त्र विभाग,श्री शिव छत्रपती महाविद्यालय ,जुन्नर (पुणे)

**प्रस्तावना :-**

शिवकालखंडामध्ये'शेती'हीच अर्थव्यवस्थे मधील अत्यंत महत्वाची बाब होती. 'खेडे 'हा अर्थव्यवस्थेचा पाया होता. उद्योगधंदे, विविध कला, चलनव्यवस्था यांचा संबंध खेडेगावाशी असे. शेतीच्या जोडीला इतरही काही उद्योगधंदे चालत असत. खेडयातील कारागिरांनी स्थलांतर करु नये यासाठी त्या कारागिरांना गावामध्येच सर्व प्रकारच्या सोयी उपलब्ध करुन देण्याकडे ग्रामव्यवस्थेचा कल असे. कारागिरांना जमिनी इनाम देण्यात येत असत किंवा बलुत्याच्या रुपाने जरुर त्या वस्तू किंवा धान्य पुरविले जात असे.आज २१ व्या शतकात आपण पाहिले तर हे चित्र वेगळे दिसते. आज अनेक व्यक्ती, कुटूंबे खेडेपासून शहराकडे उद्योगधंद्यासाठी वळलेले दृश्य पाहावयास मिळते. त्यातून वाढत्या नागरीकरणातून उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण, वाढती झोपडपट्टी समस्या, प्रदुषण अशा अनेक गंभीर समस्या जाणवतांना दिसतात.

शिवकाळात व्यवसाय व उद्योगधंदे विकास फार मोठया प्रमाणात झालेला होता. शिवकाळात जमिनीवरील व्यापारावरोबरच समुद्र मार्गानेही मोठा व्यापार चालत असे. जमिनीवरील व्यापारासाठी पुणे, नाशिक, नगर, पंढरपूर, कोल्हापूर,रायबाग इ. ठिकाणे प्रसिध्द होती. परंतु मोठया प्रमाणात व्यापार चालत होता तो समुद्रमार्गे.सागरीव्यापामध्ये वसई, ठाणे, चौल,दंडराजापुरी,मांडला,दाभोळ, संगमेश्वर, विजयदुर्ग,व बांदा येथून व्यापार होत होता. शिवकाळात चौल, दाभोळ, कल्याण, भिवंडी, पेण, वेंगुर्ला ही भरभराटीला आलेली औद्योगिक व व्यापारी केंद्रे होती.

**शिवकालीन व्यापारविषयक धोरण :-**

छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यापार विषयक धोरण अत्यंत कुशल व प्रभावी होते. त्यांचे इंग्रजांशी वागणे अत्यंत धूर्तपणाचे होते.त्यांना अर्थव्यवहाराची पूर्ण माहिती असल्यामुळे शत्रुला आपल्या राज्यात कितपत हस्तक्षेप करु द्यावयाचा याचा सारासार विचार शिवाजीराजांइतका क्वचितच हिंदी राज्यकर्त्यांने केला असेल. राष्ट्र मोठे,व्यक्ती नगण्य अशी शिवाजीराजांची भूमिका इंग्रजांबरोबरच्या व्यवहारामध्ये स्पष्ट दिसून येते. छ.शिवाजी महाराजांनी इंग्रजांना समुद्रावरील व्यापारात सवलती दिल्या. परंतु अंतर्गत व्यापारामध्ये त्यांना प्रवेश होऊ दिला नाही. इंग्रजांच्या हस्तक्षेपाची झळ देशी व्यापाऱ्यांना लागू नये अशी भूमिका त्यांनी स्विकारलेली होती.

भारतात १९९१ नंतर उदारीकरणाची प्रक्रिया वेगाने वाढलेली दिसून येते. सध्याच्या काळात परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक (FDI) व परकीय संस्थात्मक गुंतवणूक (FII) ही सातत्याने वाढतांना दिसते. पण त्याचा देशी किरकोळ,लघु व मध्यम उद्योगावर अवलंबून असणा-या लोकांवर विपरीत परिणाम होणार नाही याकडे फारसे लक्ष दिले जात नसल्याचे चित्र आपणास दिसून येते.

**शिवकालीन नाणी :**

छत्रपती शिवाजी महारांजानी **होन** हे सोन्याचे तर **शिवराई** हे तांब्याचे अशी दोन नाणी पाडली होती .ते खुद्द त्यांच्या खजिन्यात बहुंतेक नव्हतेच.आतापर्यत त्याचे दोन-तीन होन सापडले आहेत.त्यापैकी एक लहान होन भारत-इतिहास-संशोधन मंडळांत आहे.त्याजवर छत्रपती अशी अक्षरे आहेत शिवाजीच्या राज्यात सर्व परराज्यातीलही नाणी सुरु होती . महाराजांच्या खजिन्यांत ३२ जातीची सोन्याची व सहा जातींची चांदीची नाणी होती.शिवकाली टक्का हे एक नाणे प्रचारात होते. त्याशिवाय रुकाही होता. ४८ रुक्यांचा एक टक्का व १२ रुप्याचे नाणे असावे (होते.). १९२ रुक्यांचा रुपया होई. म्हणजे रुका हा अलिकडील एका पै एवढा असे. रुका हे (तांब्याचे) नाणे उपलब्ध असून त्याचे छायाचित्राही प्रसिध्द झाले आहे. सारांश, होन,रुका,शिवराई,आकडा,दमडी ही नाणी शिवकाळात प्रचारात असावी.



Scanned by CamScanner

शिवकालात महाराष्ट्रातील चलनी व्यवहार.होन,लारी,टक्के,खुर्दा,रुपये आणि मोहरा या नाण्यात चाल असे. पैकी रुपये, मोहरा व आणे यांचा व्यवहार विशेषत: उत्तरेत व महाराष्ट्रातील मोगली मुखलात चालत होता. लारी हे नाणे रुप्याचे असून त्याचा प्रचार विशेषत: कोकणात होता व देशावर कमी प्रमाणात होता.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या खजिन्यात जी नाणी होती, ती एकट्या महाराष्ट्रात चालणारी नसून अखिल भारतात चालणारी होत. त्यापैकी कित्येक त्यांना सुरत, जालना,धरणगावं,मलकापूर,कारंजा,हुबळी इ. ठिकाणच्या लुटीतही मिळाली असतील असे पुरावे सापडतात.

**शिवकालीन उत्पन्नाची साधने :-**

१.जकात
२.अबकारी कर
३.ने-आण करण्याकरील कर
४.न्यायालयीन शुल्क
५.जंगल खात्याचे उत्पन्न
६.टाकसाळ उत्पन्न
७.महत्वाच्या जागांचे लिलावाचे उत्पन्न
८.नजराणा
९.इतर राज्यांकडून मिळणारी खंडणी
१०.युध्दातील लूट
११.शत्रूच्या प्रदेशातील लूटमार
१२.वारसाविषयक कर
१३.जप्ती
१४.चाचेगिरी
१५.जहाजफुटी
१६.मच्छीमारी व इतर खाणीचे उत्पन्न
१७.मक्तेदारी
१८.सागरी व्यापार
१९.चौथ व सरदेशमुखी
२०.इतर विविध प्रकारचे कर

**शिवकालीन महसूल प्राप्ती :**

शिवकाळात राज्याचे उत्पन्न विविध प्रकारांच्या करांची आकारणी करुन मिळविले जात असे. प्रत्यक्ष कर ही उत्पन्नाची प्रमुख बाब असली तरी शिवकाळात राज्याचा बराचसा भाग हा अप्रत्यक्ष कर व संकीर्ण कर यांच्या माध्यमातून वसूल केला जावून त्यावर राज्याचा गाडा चालत असे. यातील काही प्रमुख कर खालील प्रमाणे होत.

**अ)प्रत्यक्ष कर** :-शिवकाळामध्ये प्रत्यक्ष करावर अधिक भर दिलेला दिसून येतो. व्यक्तिचे उत्पन्न,व्यवसाय आणि मालमत्ता यावर कर आकारणी केली जात असे. परगण्याचे अथवा गावचे वतनदार अधिकारी यांच्या कमाईचा काही भाग हा कररुपाने सरकार वसूल करत असे.

**१.इनामपट्टी** : इनामदाराकडून ठराविक मुदतीपर्यंत एक पट्टी अर्थात खंडणी वसूल करीत असे. त्यास इनामपट्टी असे म्हणत असे. हा कर एखाद्या अधिकाऱ्यावर लादत असत. अशा अधिकाऱ्याला काही जमीन सारामुक्त या स्वरुपात या स्वरुपात दिलेली असे. हा कर जमिनीची प्रतवारी ठरवून आकारला जात होता.

**२.इनामती खंडणी** : खंडणी म्हणजे व्यक्तीकडून हक्काने वसूल करावयाचा कर होय. ज्या लोकांना अलीकडेच इनामदार केलेले आहे. त्यांच्याकडून हा कर वसूल केला जात होता.

**३.मिरासपट्टी** : मिरासदार म्हणजे खेडेगावातील जमिनीचे मालक होय. मिरासदारांकडून त्यांच्या फायद्यापैकी काही भाग कराच्या रुपाने वसूल करीत असत. त्याला मिरासपट्टी असे म्हणत. हा कर देखील जमिनीची प्रत किंवा उत्पादनावर ठरविला जात असे.

**४.व्यवसायकर** : इनामपट्टी, इनामत खंडणी व मिरासपट्टी हे कर व्यक्तीच्या उत्पन्नावर आधारित होते, तर व्यक्तीच्या व्यवसायावर काही कर आकारले जात असत.

**४.१.सराफपट्टी** : सराफ म्हणजे गावातील सोन्याचांदीचा व्यवसाय करणारी व्यक्ती. हा सराफ चांदीची नाणी मोजून घेण्याचे काम करीत असे. त्याच्या व्यवसायावर जो कर बसवत त्याला सराफपट्टी असे म्हणत.

**४.२.धनगरपट्टी** : धनगराचा व्यवसाय हा नुसताच शेळयामेंढया पाळण्यापुरता मर्यादित नव्हता तर मेंढयांची लोकर काढणे, कांबळी तयार करणे इ. कामे त्यांच्याकडून अपेक्षित असत. मेंढयांच्या कळपातील एक मेंढी दरवर्षी वतनदाराला द्यावी असा रिवाज होता. धनगराने विकलेल्या

लोकरीवर किंवा त्याने विकलेल्या कांबळयावर जो कर घेत असत, त्याला धनगरपट्टी म्हणत.

**४.३.माग टका :** हा कर विणकरांकडून वसूल करीत असत. काही वेळा वस्तूच्या स्वरुपात तर काही वेळा रोख रकमेच्या वसूल करीत असत. रोख रकमेच्या स्वरुपात वसूल करीत असत. रोख रक्कम म्हणजे प्रत्येक मागाला पाव टका कर असे व वस्तूच्या स्वरुपात म्हणजे एक साडी किंवा धोतर किंवा एक पटका द्यावा लागत असे.

**४.४.पायपोसी** :चर्मकाराकडून वसूल करावयाचा हा कर होय. प्रत्येक चर्मकाराने दरवर्षी पाटील व कुलकर्णी यांना एकेक जोड द्यावा.

**४.५.तेलपट्टी** :हा कर तेल्याकडून वसूल करीत असत.

**४.६.वेठबिगार :** हा कर अप्रत्यक्ष, न जाणवणारा व नोकरीच्या स्वरुपात वसूल करावयाचा होता. वेठबिगार म्हणजे सक्तीची सेवा होय. बाजारभावापेक्षा कमी दरात कुशल किंवा अकुशल कामगारांकडून काम करुन घेण्याची ही पध्दत होती. वंशपरांगत अधिकाऱ्यांचा लोकांकडून वेठबिगारी करवून घेणे हा एक विशेष हक्क होता.

**४.७.मोहतर्फा :** हा कर व्यापाऱ्यांकडून वसूल केला जात असे. खेडेगावातील पांढरीमध्ये राहणाऱ्या लोकांकडून हा कर वस्तुच्या स्वरुपात वसूल करीत असत. किराणा- भुसार व्यापारी, लोणीवाले, कापड दुकानदार, फळ विक्रेते,खाटीक यांच्याकडून हा कर वसूल करीत.

**४.८.हेजीव पट्टी :** हेजीव म्हणजे प्रतिनिधी होय, जर काही कारणासाठी गावकऱ्यांनी आपला प्रतिनिधी सरकारकडे पाठवावयाचे ठरले तर त्याच्या खर्चासाठी लागणारा पैसा गोळा करीत असत. त्या पैशाला हेजीव पट्टी असे म्हणत.

**४.९.कारागिरांवरील कर :** गावातील न्हावी, परीट,सुतार,शिंपी,लोहार यांच्याकडून पाव टका कर वसूल करीत असत. काही वेळा गुरव,तराळ,कुंभार यांच्याकडूनसुध्दा हा कर वसूल करीत.

**ब) अप्रत्यक्ष कर :** शिवकाळात देश-परदेशात विविध वस्तुंच्या माध्यामातून मोठया प्रमाणावर व्यापार चालत होता.या आयात-निर्यातीवर सरकार मार्फत कर आकारला जात होता तो खालीलप्रमाणे..

**१.जकात कर** :परदेशातून स्वराज्यात व स्वराज्यातून परदेशात जाणाऱ्या मालावर जकात कर आकारला जाई. जकात ही उत्पन्नाची एक खास बाब होती. चौल, राजापूर, वेंगुर्ला, दाभोळ,रत्नागिरी,पनवेल,दंडाराज पुरी ,चिपळूण, वसई,ठाणे इत्यादी. शिवकाळातील तत्कालीन प्रमुख बंदरे होती. महाराष्ट्राच्या आयात-निर्यातीचा व्यापार हा याच बंदरांच्या माध्यमातून होत असे.

**२.मिठावरील कर :** अन्नातील प्रमुख घटक म्हणजे मिठ. कोकणामध्ये भातशेतीबरोबर मीठ तयार करणे हा एक जोडधंदा केला जात होता. समुद्रकिनारी अशी मोठमोठी मिठागरे निर्माण करुन मिठ निर्मिती केली जाई. पश्चिम किनाऱ्यावर अशी बरीच मिठागरे होती. शिवकाळात मिठावरील कर हा महत्वाचा मानला जात होता.

**३.शिंगशिंगोटी (जनावरे व गुलामावरील कर ) :** जनावरांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारावरही कर आकारला जात असून याला शिंगोटी असे म्हणत असत.

**४.संकीर्ण किंवा इतर कर (आकस्मिक कर) :** संकीर्ण कर मात्र नियमित वसूल न करता राज्य जेव्हा आर्थिक संकटात असेल तसेच शुभ प्रसंगी काही कर जनतेकडून वसूल अथवा स्विकारले जात असत.

**५.सिंहासन पट्टी :** सिंहासन पट्टी अथवा तख्तपटी नावाचा एक प्रासंगिक कर होता. शिवाजी राजांनी राज्यभिषेकाच्या वेळी हा कर जमिनदारांवर आकारला होता. त्याचप्रमाणे राज्यातील वतनदार,जहागिरदार,मोठमोठे व्यापारी हे शुभप्रसंगी राजाला स्वखुशीने भेट वस्तू देत असत. या भेटवस्तू नजराणे शेवटी सरकारी खजिन्यात जमा केल्या जात असत.

**६.खर्चपट्टी :** यंदा कदाचित राज्यावर आकस्मिक संकट जसे दुष्काळ,पूरस्थिती, अथवा परकीय आक्रमणाने झालेले नुकसानी भरुन काढण्यासाठी हा कर वसूल केला जात असे. तसेच सार्वजनिक कामासाठी लागणाऱ्या खर्चापोटी ही खर्चपट्टी वसूल केली जात होती.

**७.उल्फापट्टी :** उल्फा याचा अर्थ शिधा असा आहे. सरकारी अधिकारी अथवा इतर कोणी महत्वाची व्यक्ती गावात आली असेल अथवा त्यांच्या गावातून जात असेल तर त्यांची सरबराई गावातर्फे केली जात असे. या सरकारी



Scanned by CamScanner

सरबराईसाठी गावकऱ्यांकडून धान्य अथवा इतर खाद्यपदार्थांच्या वस्तू गोळा केल्या जात असत. त्यास उत्फापट्टी असे म्हणत.

**सारांश :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कुशल व्यवस्थापनामुळे त्याकाळात कच्चा व पक्का माल देशातच पैदा होत असल्यामुळे कोणत्याही बाबतीत इतर देशाच्या तोंडाकडे पाहावे लागत नव्हते. या पध्दतशीर व्यवस्थेने भारतातील उद्योगधंदे वाढले व त्यांच्या बळावर त्यांना जगातील संपत्ती आपणाकडे ओढून घेता आली. हिंदुस्थानात एक वेळ सोन्याचा धूर निघत होता असे म्हणतात त्याचे कारण हे होय.

**संदर्भ सूची :**

१.भावे वा. कृ.,'शिवकालीन महाराष्ट्र', वरदा प्रकाशन, पुणे
२.सरदेसाई बी.एन.,'मराठयांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास', फडके प्रकाशन , पुणे.
३.कुलकर्णी अ.रा.,'शिवकालीन महाराष्ट्र' राजहंस प्रकाशन, पुणे.
४.चिटणीस कृ.ना.,'मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, भाग ३',(व्यापार व उद्योगधंदे),समर्थ मुद्रणालय, पुणे.
५.गोडबोले अच्युत,'अर्थात', राजहंस प्रकाशन, पुणे.
६.www.Google.co.in

३



Scanned by CamScanner